अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १३३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ।

B भारतीय J जिल्हा P परिषद

बलाढ्य भाजपची एकहाती सत्ता!

जयाभाऊंची हॅट्ट्रिक!

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात भाजपनं पहिल्यादांच स्व:बळावर निवडणूक लढवली आणि सत्ता काबिज करण्यासाठीच्या मॅजिक फिगरचा आकडा पार केला. जणू काही पहिल्याच बॉलवर 'सिक्सर' ठोकला.बलाढ्या भाजपला टक्कर देण्यासाठी या जिल्ह्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले. मात्र त्यांच्या एकत्र येण्याच्या जादूचा 'करिष्मा' दिसला नाही. अजित पवार राष्ट्रवादी गटाला १० आणि शरद पवार गटाला अवघ्या ६ जागा ताब्यात घेण्यात यश मिळालं. शिंदेसेनेच्या धनुष्यबाणाचीही जादू चालली नाही. अवघ्या ८ जागेवर त्यांना विजय मिळवता आला. करमाळा विकास आघाडीला केवळ २ जागा मिळवता आल्या. सांगोला शेकाप विकास आघाडीला प्रत्येकी ३ जागेवर यश मिळालं. पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आघाडीनं एका जागेवर खातं खोललं. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे पक्षाची अब्रू गेली. एकही जागा त्यांना घेता आली नाही.स्व:बळावर सत्ता मिळवण्याचं 'व्हिजन' ठेवणार्‌या भाजपनं सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गटांपैकी तब्बल ३८ गटावर तर पंचायत समित्यांच्या १३६ पैकी ७६ जागेवर उमेदवार निवडून आणून सोलापूर जिल्हा परिषदेसह ११ पंचायत समित्यांपैकी ७ ठिकाणच्या पंचायत समित्यांमध्ये एकहाती सत्ता आणण्याचा पुन्हा षटकार ठोकला. सुरुवातीला नगरपरिषदा आणि नगरपंचायत त्यानंतर सोलापूर महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्या असा लागोपाठ विजयाचा सिलसिला' या पक्षानं कायम ठेवला. 'बार-बार...हर बार..., चुनाव जितते है, उसे भाजप कहते है!' याचा प्रत्यय आणून दिला.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

'वन मॅन आर्मी ...यहाँ का राजा' वाहवा !

महा महाआघाडीचा धोबीपछाड, बार्शीत भाऊंची 'सरशी'

दोन राष्ट्रवादी आणि दोन शिवसेना अशा महा महाआघाडीचा प्रयोग बार्शी तालुक्यातील निवडणुका जिंकण्यसाठी आमदार दिलीप सोपल यांनी केला होता. बलाढ्य राजेंद्र राऊत यांना आव्हान देण्यासाठी त्यांनी केलेला हा प्रयोग राज्यभर चर्चेत आलेला होता. मात्र हा प्रयोग पूर्णपणे फसला. या तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्वच्या सर्व सहा आणि पंचायत समितीच्या १२ जागांवर माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी दणदणीत विजय मिळवून महा महाआघाडीला चारीमुंड्या चित करत सलग पाचव्यांदा या तालुक्याच्या पंचायत समितीवर निर्निवाद आपली हुकमत आणली. सुरुवातीला बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती त्यानंतर नगरपरिषद आणि आता जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या निवडणुकीत विजय संपादन करुन 'वन मॅन आर्मी'...यहाँ का राजा' वाहवा !' याचा प्रत्यय आणून देत बार्शी तिथं भाऊची 'सरशी' ही नवी टॅगलाईन आणली.

अर्धांगिनीचा 'विजय', सुपुत्राचा 'पराजय', आमदार उत्तम जानकरांना 'दे धक्का'

माळशिरसचे राष्ट्रवादी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार उत्तम जानकर यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत दे धक्का' बसला. वेळापूर जिल्हा परिषदेच्या गटातून अर्धांगिनी विमल या विजयी झाल्या. तर दहिगाव गटातून माजी आमदार राम सातपुते यांच्या सौ' संस्कृती यांनी सुपुत्र जीवन जानकर यांना पराभवाची धूळ चारली. जानकर परिवारासाठी महत्वाच्या ठरलेल्या निवडणुकीच्या निकालात आमदार सौ' यांचा विजय आणि तर सुपुत्राचा पराभव झाला. चिरंजीवाचा झालेला पराभव आमदार जानकरांच्या जिव्हारी लागणारा आहे.

नरखेडकर पाटील बंधुंचा अनपेक्षित पराभव

नरखेडकर पाटील बधुंचा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत निसटता पराभव झाला. अवघ्या जिल्ह्याचं लक्ष लागून राहिलेल्या कुरुल गटातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांचा १३०३ मतांनी अनपेक्षित पराभव झाला. तसेच त्यांचे मोठे बंधू संतोष पाटील हेदेखील नरखेड गटातून पराभूत झाले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

म्हणजे आपल्या नळाला दररोज पाणी येणार ?

कल्याण
458-77-250

मुंबई
135-99-360

'दक्षिण'ला मगं कसं? बापू म्हणत्याल तसं!

आमदार देशमुखांची 'एकच झलक लेकिन सबसे अलग' मर्जीमधील कार्यकर्त्यांना उमेदवार्‌या देऊन आमदार सुभाष देशमुख यांनी सर्वच उमदेवारांच्या पाठिशी ताकद लावली. यातून दक्षिण'मधील निवडणुकांमध्ये कमळ' फुललं. या तालुक्यात देशमुख आणि भाजपचं असलेले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झालं.

पक्षीय बलाबल (जिल्हा परिषद गट ६८)

भाजप	३८
राष्ट्रवादी अजित पवार	१०
राष्ट्रवादी शरद पवार	०६
शिंदेसेना	०८
करमाळा विकास आघाडी	०२
सांगोला शेकाप आघाडी	०३
तीर्थक्षेत्र विकास आघाडी	०१
एकूण	**६८**

पक्षीय बलाबल (पंचायत समित्या गण १३६)

भाजप	७६
राष्ट्रवादी अजित पवार	१९
राष्ट्रवादी शरद पवार	११
शिंदेसेना गट	१४
शेकाप	०९
करमाळा आघाडी	०४
तीर्थक्षेत्र आघाडी	०३
एकूण	**१३६**

पंढरपूरमध्ये 'ऑपरेशन लोटस' फेल

या निवडणुकीत सांगोल्यात पुन्हा एकदा शेतकरी कामगार पक्षाने ५५ वर्षाची आपली असलेली सत्ता अबाधित राखत पुन्हा एकदा सांगोला तालुका विकास आघाडीच्या माध्यमातून बहुमत मिळविले आहे. मोहिते-पाटील यांनी आपला माळशिरसचा गड उत्तम जानकर यांच्या मदतीने पुन्हा एकदा राखला असून माळशिरस मध्ये दोन्ही राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांच्या आघाडीची सत्ता पंचायत समितीवर येणार आहे. पंढरपूर मध्ये ऑपरेशन लोटस फेल झाल्याचे उघड झाले असून अजित पवार गटातून भाजपमध्ये आलेले कल्याणराव काळे आणि गणेश पाटील यांच्याकडे देण्यात आलेले तीनही गट भाजपने गमावले आहेत. त्यामुळे ऑपरेशन लोटस'चा एक प्रकारे फटका पंढरपूरमध्ये भाजपाला बसल्याचे चित्र आहे.

कल्याणशेट्टी परिवारामधील चौथे सत्तेमधील सिंहासनावर; उमेदवारी अन् विजयाचा योगायोग, भाजप देता है तो छप्पर फाडके !

अक्कलकोटचे भाजपचे विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या परिवारासाठी निवडणुकीमधील उमेदवाऱ्या आणि विजयाचा योगायोग आला. सुरुवातीला सचिन कल्याणशेट्टींना अक्कलकोट तालुक्याच्या आमदारकीचं सिंहासन मिळालं. त्यानंतर त्यांचे बंधू मिलन कल्याणशेट्टी हे अक्कलकोटचे प्रथम नागरिक म्हणजे नगराध्यक्ष झाले. त्यानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत सचिन कल्याणशेट्टी यांच्या अर्धांगिनी शांभवी या चपळगाव गटातून निवडून आल्या. त्या जिल्हा परिषदेच्या सदस्या झाल्या. तर बंधू सागर कल्याणशेट्टी हे पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आले. भाजपची पाठिशी मोठी ताकद, आरक्षणातून निर्माण झालेली संधी, उमेदवारींवर भाजपनं उठवलेली मोहर आणि निवडणुकीत मिळालेला मतदारांचा कौल या सगळ्यांचा योगायोग कल्याणशेट्टी परिवारसाठी तर आलाच आला. पण 'भाजप देता है तो, छप्पर फाडके'याचा प्रत्ययदेखील आला.

'हम भी कुछ कम नही!'

संस्कृती सातपुते अन् शांभवी कल्याणशेट्टींची 'झेडपी'त ग्रँड एंन्ट्री!

दहिगाव जिल्हा परिषदेच्या गटातून माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती निवडून आल्या. तर आमदार उत्तम जानकर यांचे सुपुत्र जीवन यांचा त्यांनी पाडाव केला. अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव जिल्हा परिषदेच्या गटातून विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सौभाग्यवती शांभवी यांनी विजय संपादन केला. जिल्ह्यातील आजी-माजी आमदारांच्या सौभाग्यावती रणरागिणींची 'ग्रँड' एंट्री सोलापूरच्या मिनीमंत्रालयात होणार आहे.

करमाळ्यात रश्मीदीदी अन् संजयामामाचं घोडं न्हालं गंगेत !

माजी आमदार संजयमामा शिंदे आणि बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल -कोलते म्हणजे राष्ट्रवादी आणि भाजप यांनी युती करुन करमाळा तालुक्यातील निवडणुका लढवल्या होत्या. त्यांना माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी पाठिंबा दिला होता. तर विद्यमान आमदार नारायण पाटील यांनी करमाळा विकास आघाडी करुन इतर सर्वांना आपल्यासोबत घेतलं होतं. रश्मी बागल-कोलते या स्वत: विजयी झाल्या. त्याशिवाय भाजप आणि राष्ट्रवादीच्या युतीचे उमेदवार मोठ्या संख्येनं विजयी झाले.

पिताश्रीच्या नेतृत्वाची पुण्याई; दादा झेडपीत, ताई पंचायत समितीत! म्हेत्रे परिवारातील बहिण-भावानं पहिल्याच निवडणुकीत उधळला गुलाल

राज्याचे माजी गृहमंत्री तथा शिंदेसेनेचे नेते सिद्धाराम म्हेत्रे यांचे सुपुत्र शिवराज म्हेत्रे हे अक्कलकोट तालुक्यातील सलगर जिल्हा परिषद गटातून निवडून आले. तर कन्या शीतल या तोळणूर पंचायत समितीच्या गणातून विजयी झाल्या. म्हेत्रे परिवारातील बहिण -भाऊ पहिल्यांदाच निवडणुकीत रिंगणात उतरले अन् विजयाचा गुलालदेखील त्यांनी उधळला. पिताश्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाची पुण्याई या दोघांच्या विजयासाठी पदरी पडली. 'विजयीभव' असं बहिण-भावाचं यश लक्षात घेता, शिवराज जिल्हा परिषदेत आणि शीतल पंचायत समितीत असं ते समीकरण झालं. म्हेत्रे परिवारातील दोघांचं नेतृत्व दोन ठिकाणी झळकण्याला प्रारंभ झाला.



माने परिवाराच्या तिसऱ्या पिढीची राजकारणात 'रॉयल' एन्ट्री,

मालकांच्या नेतृत्वाची मिळाली ताकद, सुपुत्र 'पॉलिटिक्स'च्या ट्रॅकवर स्व.ब्रम्हदेवदादा माने त्यानंतर माजी आमदार दिलीप माने अशा या परिवारातील दोन पिढ्या राजकारणात राहिलेल्या. त्यानंतर तिसऱ्या पिढीचं पृथ्वराज माने हे कोंडी जिल्हा परिषदेच्या गटातून निवडून आले. पिता दिलीप माने यांच्या नेतृत्वाची पुण्याई त्यांची पदरी पडली. पृथ्वीराज यांच्या राजकीय वाटचालीस प्रारंभ झाला. जिल्हा परिषद सदस्य होऊन तेपॉलिटिक्स'च्या ट्रॅकवर आले. त्यांच्या विजयाची अक्षरश: दिवाळी सोलापुरातील होटगी रस्त्यावरच्या सुमित्रा निवासस्थानी दक्षिण आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील माने समर्थकांनी साजरी केली. यावेळी मैं हुं डॉन' या गाण्यावर समर्थकांसह दिलीप माने यांनी ठेका धरला. विशेषत्वे, माने परिवारात विजयाची दोन वेळा दिवाळी साजरी झाली. नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत माने परिवारातील जयकुमार माने सोलापूर महापालिकेसाठी नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यावेळी माने समर्थकांनी विजयी जल्लोष करत दिवाळी साजरी केली आणि त्यानंतर सोमवारी पृथ्वीराज यांच्या विजयाची पुन्हा दुसऱ्यांदा दिवाळी साजरी केली.

'भाजप और जयाभाऊ है तो मुमकीन है!'

जिल्हा परिषदेच्या एकूण ६८ जागांपैकी ३८ जागा जिंकत महापालिके पाठोपाठ जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजपनं चमत्कार करून दाखवला आहे. जिल्ह्यातील पंचायत समितीच्या १३६ जागांपैकी ७६ जागा भाजपने जिंकल्या आहेत. जिल्हा परिषदेसह या जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये या पक्षानं पंचायत समित्यांमध्ये स्वबळावर सत्ता आणली आहे.सोलापूर जिल्हा परिषदेत प्रचाराची धुरा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वतः च्या खांद्यावर घेऊन जवळपास ३० ते ३५ सभांचा झंजावात निर्माण केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर प्रचाराचा रंग जरी बदलला असला तरी शेवटचे दोन दिवस वगळता पालकमंत्री रोज जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा घेताना दिसले होते. त्याचाच परिणाम भाजप स्वबळावर जिल्हा परिषदेमध्ये आणि सात पंचायत समित्यांमध्ये आली आहे. करमाळ्यामध्ये सुनेत्रा पवार राष्ट्रवादी सोबत भाजपची सत्ता असेल.

८० वर्षीय तरुण योद्ध्याला सातव्या वेळी 'विश्रांती' घेण्याचा कौल

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटाच्या ज्या काही लक्षवेधी लढती झाल्या, त्यामध्ये उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ जिल्हा परिषद गटात लक्षवेधी लढत झाली. वयाची ८० पार केलेले जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बळीराम साठे यांचा या मतदारसंघातून भाजपाचे कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी ४ हजार ९६१ मतांनी पराभव केला. साठे हे तब्बल सातव्यांदा जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. आपणही शेवटची निवडणूक लढवत आहोत असं सांगत त्यांनी निवडणुकीत चांगला ताण काढला होता. मात्र निवडणुकीच्या आखाड्यात इंद्रजीत पवार यांचा सामना करताना त्यांना अपयश आलं. बळीराम साठे यांचा होमपीच नान्नज मतदार संघ आरक्षणात इतर प्रवर्गाला गेल्याने, त्यांना शेजारच्या बीबीदारफळ जिल्हा परिषद गटातून उभे राहावं लागलं, मात्र या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना 'विश्रांती' घेण्याचा कौल दिला. विशेषत्वे, बळीराम साठे यांचं मोठं वलय असलेला वडाळा पंचायत समितीचा गण राखण्यात त्यांना यश आलं. मात्र दुसरीकडे अनेक वर्ष साठे यांच्या नेतृत्वाखाली निवडून येणारा नान्नज पंचायत समितीचा गड भाजपाने काबीज केला.